जनप्रवास

# गणितज्ञ मीनू जोखी एक लोकविलक्षण व्यक्तिमत्व

*मीनू जोखी हे एक प्रेरणादायी व्यक्तीमत्व आहे. त्यानी मिळविलेलं यश हे अत्यंत कष्टप्रद परिस्थितीत मिळवलं आहे.*

*मीनू जोखी हे शालेय जीवनात गणित या विषयात खूपच कच्चे होते. आपल्या जीवनाचे गणितही सुटणार नाही असंच त्याना वाटायचं. तो जीवनात खरोखर दुःखी होता. मीनूच्या आईवडिलांचा घटस्फोट झाला मीनूला त्याची आई केटी हिने प्रोत्साहन दिलं आपल्या यशाचं सारं श्रेय तो आपल्या आईला देतो. सर्व निराशा अपयश याना मागे टाकून त्यानं स्वतःला सिद्ध केलं आणि तो ख-या अर्थाने मानवी कॅलक्युलेटर बनला.*

*मीनू २००० पेक्षा अधिक जन्मदिनांक लक्षात ठेवू शकतात; शेकडो दूरध्वनी क्रमांक त्यांच्या स्मरणात आहेत. जानेवारी १६०० पासून कोणत्याही तारखेचा वार आपल्याला सांगू शकतात तसेच १०००००००० (१०० कोटी) पर्यंतच्या संख्येचे वर्गमूळ, घनमूळ सांगू शकतात.*

*जनरल सॅम मानेकशॉ यांच्यानंतर बॉम्बे हिल्स साऊथच्या रोटरी क्लबचे प्रतिष्ठित मानद सदस्य म्हणून सन्मानित करण्यात आलेले मिनू जोखी हे दुसरे व्यक्ती आहेत. त्यांनी संपूर्ण मुंबईमध्ये आपले अनेक मनोरंजक गणितविषयक कार्यक्रम केले आहेत. भारतातील धरमपूर, राजकोट, केरळ, बेंगलुरू, अहमदाबाद, कोलकाता, मायापूर, चेन्नई, नवसरी, चेन्नापट्टन आणि लोणावळा येथे प्रशिक्षण वर्ग घेतले आहेत. अमेरिका, कॅनडा, स्पेन, इंडोनेशिया आणि श्रीलंकेत यादेशात कार्यक्रम करून आपल्या देशाचे नाव उज्वल केले आहे.*

*मीनूचे १० पेक्षा अधिक कार्यक्रम विविध टी. व्ही चॅनेल्सवर तसेच दूरदर्शनवर झाले आहेत. ७ वर्षे त्याने श्रीलंकेच्या विविध शहरात आपले कार्यक्रम सादर केले आहेत. एका टी.व्ही. शोमध्ये (नागिन ३) पंडित म्हणून काम केले आहे. अनेक प्रतिष्ठित शाळा, महाविद्यालये, क्लब आणि कंपन्यांनी त्याना आमंत्रित केले आहे. आजपर्यंत ७५० हून अधिक कार्यक्रम त्यांनी सादर केले आहेत. मीनूकडे उपजतच संशोधकवृत्ती असल्याने त्याने स्मरणशक्तीच्या अनेक युक्त्या आणि तंत्रे तयार केली आहेत. आजच्या अभ्यास पद्धतीत स्मरणशक्तीला असाधारण असं महत्त्व प्राप्त झाले आहे. विशेष करुन स्पर्धा परिक्षात यश मिळवायचे असेल तर स्मरणशक्तीचा विकास करणे महत्त्वाचे ठरत आहे. विविध गटातील विद्यार्थ्यांकरता खास असे अभ्यासक्रम त्यांनी तयार केले आहेत. आजवर अशाप्रकारे हजारोंच्या जीवनात सकारात्मक बदल होण्यास मदत झाली आहे, या प्रशिक्षणाला आता मेमरी एनहॅन्समेंट टेक्निकल कोर्स असे म्हटले जाते. अगदी ४ वर्षाच्या मुलांपासून ते ७० वर्षे वयाच्या ज्येष्ठ व्यक्तीकरिताही अशा प्रकारचे प्रशिक्षण उपलब्ध आहे. गणितासारख्या रुक्ष व कठीण विषयांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये गोडी निर्माण करणे शक्य झाले आहे.*

*मीनूच्या मते आज लोक आधुनिक तंत्रज्ञानावर खूप अवलंबून आहेत अगदी लहान सहान गोष्टीसाठी पण यंत्रावर अवलंबून आहेत. लोक गुंतागुंतीच्या विषयांपासून घाबरतात विद्यार्थ्यांना सुरूवातीपासूनच गणित विषयाची भीती वाटू लागते. आजच्या नव्या पिढीला तीसापर्यंत पाढे येत नाहीत. आजचा शिक्षकवर्ग विद्यार्थ्यांच्या मनातील भीती नाहीशी करण्यासाठी काही प्रयत्न करताना दिसत नाही. मीनू यांनी अनेक प्रकारच्या पद्धती शोधल्या आहेत या पद्धती वापरून गणित याविषयाची गोडी वाटू शकेल. याकरिता शाळांनी सामाजिक संस्थांनी संपर्क केल्यास मीनू सर्व प्रकारचे सहकार्य देण्यास तयार आहेत.*

*या गणितज्ञाबद्दलची सर्वात चांगली गोष्ट अशी आहे की तो सतत शिकण्यासाठी भुकेलेला आहे आणि आश्चर्यकारकपणे बहुमुखी आहे. तो एक विस्मयकारक सार्वजनिक वक्ता आहे ज्याने १५ हून अधिक बक्षिसे जिंकली आहेत, विमा, अभिनय, संख्याशास्त्र इ. मध्ये विशेष रस घेतला आहे. त्यांना आपल्या विद्यार्थ्यांना शिकवण्याची आवड आहे आणि त्यांच्या प्रशिक्षणाचा फायदा हजारो विद्यार्थ्यांनी घेतला आहे. अनेकांच्या जीवनात परिवर्तन घडून आले आहे. त्यांच्याकडे एक वेबसाइट आहे:* *ु.ळपेक्षेज़हळ.ळप जेथे अनेक एमटीएच युक्त्या आणि स्मृती विकास तंत्रांचा उल्लेख केला आहे.*

*गणित व स्मरणशक्तीचे मीनू यांचे कार्यक्रम म्हणजे एक पर्वणीच असते. आपल्या स्मरणशक्तीत कशी सुधारणा करावी तसेच मनाची एकाग्रता कशी वाढवावी याबाबत साध्या व सोप्या सूचना ते देतात. दैनंदिन जीवनात विसरभोळेपणामुळे आपले नुकसान होते ते टाळता येऊ शकते. महाराष्ट्रात त्यांनी अनेक ठिकाणी कार्यक्रम केले आहेत.*

*आज सर्वत्र स्पर्धात्मकता असल्याने प्रवेशासाठी परिक्षा द्याव्या लागतात. केंद्र व राज्य स्तरावरील लोकसेवा आयोगाच्या परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी खूप परिश्रम घ्यावे लागतात. गेल्या काही वर्षांत महाराष्ट्राची टक्केवारी वाढली असली तरी आणखी वाढ होऊ शकते.*

*याकरिता अनेक संस्थांनी मीनू यांच्याकडून सहकार्य मागितले आहे. प्रशिक्षणाची माहिती देण्यासाठी अन्य शहरात कार्यक्रम करण्याची त्यांची तयारी आहे.*

*क्रिकेट, टेनिस, तसेच अभिनय क्षेत्रातही मीनू याना आवड आहे. वक्तृत्वकलेचे प्रशिक्षणही ते देतात. अशा लोकविलक्षण मीनू जोखी याना संपर्क या नंबरवर अवश्य करावा. मीनू जोखी :९८२१४०७५१९*

– देवदत्त मुळगुंद